CNR No. MHOS040003122026

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८८/२०२६
मंगल दिगंबर काळे वि. निरंक

## निशाणी क्रमांक १ वर आदेश

१. सदर अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ प्रमाणे हेअरशिप सर्टीफीकेट (वारस प्रमाणपत्र) मिळण्यासाठी करण्यात आला आहे. अर्जदार यांचे कथन असे की, दिगंबर संभाजी काळे हे दिनांक १४/११/२०२५ रोजी मौजे अणदूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथे मयत झाले आहे. मयत दिगंबर संभाजी काळे हे अर्जदार क्र.१ यांचे पती असून अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडिल आहेत. मयत दिगंबर संभाजी काळे यांची आई मंदाबाई संभाजी काळे हया २० वर्षा पुर्वी मयत झाल्या आहेत. मयत दिगंबर संभाजी काळे यांना अर्जदार यांच्याशिवाय अन्य कोणतेही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकिय कामकाजासाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे. सबब, मयत दिगंबर संभाजी काळे यांचे वारस म्हणून अर्जदार यांनी वारस दाखला देण्याची विनंती केली आहे.

२. मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या सिविल मॅन्युअल चॅप्टर १९ पॅ. ३३७ प्रमाणे वारस दाखल्याच्या बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ मधील अर्जाबद्दल ज्युडिशिअल इन्क्वायरी करणे अपेक्षित आहे. तसेच फक्त हेअरशिप सर्टीफिकेटमार्फत मयताच्या मिळकतीत कोणताही मालकी हक्क उद्धोषीत होत नाही असा कायदा आहे.

३. सदर अर्जाबद्दल वर्तमानपत्रात जाहीर नोटीस काढुन व जाहीरनामा उदघोषित करुन, अर्जाबद्दल आक्षेप असल्यास कोर्टात हजर करण्याचा हुकूम पारित करण्यात आला. तसेच मयत यांच्या हिंदु वारसा

कायदयाप्रमाणे कायदेशिर वारस याबद्दल माहिती देण्यास अर्जदार यांस निर्देश देण्यात आला. त्याप्रमाणे ''दैनिक संघर्ष समजावादाचा या वर्तमानपत्रामध्ये दिनांक २८/०३/२०२६ जाहीर नोटीस (नि.क्र.१० कडे) काढण्यात आली. असे असूनही अदयाप कोर्टासमक्ष, सदर अर्जास कोणतेही आक्षेप सादर नाही.

४. अभिलेखावर अर्जदार यांनी मयत दिगंबर संभाजी काळे यांचा मृत्यू दाखला (नि.क्र.४/१ कडे) दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, मयत दिगंबर संभाजी काळे हे मौजे अणदूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथे मयत झाले असून, ते मरणसमयी मौजे अणदूर, ता. तुळजापूरचे रहिवासी होते. अर्जदार यांच्या आधार कार्डची व्हेरीफाईड प्रती (नि.क्र.४/२ ते ४/४ कडे) सादर केली आहे.

५. अर्जास पृष्ठार्थ प्रतिज्ञापत्र अर्जदार क्र.२ आनंत दिगंबर काळे यांनी सादर केले आहे. अर्जास दुजोरा देणारे अर्जदार क्र.३ गुणवंत दिगंबर काळे यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.११ कडे) दाखल आहे. तसेच साक्षीदार क्र.१ भारत सदाशिव गायकवाड (नि.क्र.१२ कडे) व साक्षीदार क्र.२ राजेंद्र आगजप्पा जोगदंड (नि.क्र.१३ कडे) यांनी त्यांचे पुराव्योच प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार यांनी पुरावा बंद करण्याची पुरसिस (नि.क्र.१४ कडे) दाखल आहे.

६. पुराव्याचे प्रतिज्ञपत्रांचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत दिगंबर संभाजी काळे हे दिनांक १४/११/२०२५ रोजी मौजे अणदूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथे मयत झाल्याने त्यांच्या मरणोत्तर त्यांची मरणसमयी जिवीत असलेले वारस

हे कायदयाप्रमाणे त्यांचे वारसदार ग्राहय धरले जातात. म्हणून अर्जदार हे मयत दिगंबर संभाजी काळे यांचे वारस असल्याबद्दलचा पुरावा दिला असल्याने ते मयत यांचे कायदेशीर वारस दिसून येत आहेत. सबब, खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ प्रमाणे अर्जदार क्र.१ मंगल दिगंबर काळे, २. आनंत दिगंबर काळे व ३. गुणवंत दिगंबर काळे हया मयत **दिगंबर संभाजी काळे** यांचे वारस असल्याबद्दलचा दाखला हेअरशिप सर्टीफीकेट देण्यात यावे.

३. संदर्भित कायदेशीर शुल्क अर्जदार यांनी अदा करणे.

४. अर्ज या प्रमाणे निकाली काढण्यात येत आहे.

AVINASH ANANDRAO DHOKE
Digitally signed by AVINASH ANANDRAO DHOKE
Date: 2026.05.06 16:01:54 +0530

दिनांक : ०६/०५/२०२६ (अविनाश आ. ढोके)

ठिकाण : तुळजापूर २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, तुळजापूर.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Quadri M.F. |
| Court | --- | 2nd Jt.CJJD & JMFC Tuljapur |
| Date | --- | 06.05.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 06.05.2026 |
| Order uploaded on | --- | 06.05.2026 |